GOVERNMENT OF KARNATAKA

# DEPARTMENT OF SCHOOL EDUCATION ( PRE - UNIVERSITY)

# REVISED QUESTION BANK -2024-25

## SAHITYA MANTHAN PART - I

## SUBJECT : MARATHI (07)

## FIRST YEAR PUC

# REVISED QUESTION BANK -2024-25

# QUESTION BANK -2024-25


1. SHRI SURESH V. PATIL ------ CO-ORDINATOR
   LECTURER IN MARATHI
   JYOTI PU COLLEGE BELGAUM
   COLLEGE CODE NO. : DD0034

2. SHRI PREMANAND .S. PARAB ------ MEMBER
   LECTURER IN MARATHI
   BGVS PU COLLEGE RAMNAGAR,
   JOIDA , KARWAR ( U.K.)
   COLLEGE CODE NO. QQ0044

3. SHRI NAGAPPA M. SANADI ------ MEMBER
   LECTURER IN MARATHI
   MARATHA MANDAL'S PU COLLEGE
   KHANAPUR , DIST : BELGAUM
   COLLEGE CODE NO : DD0011

4. SMT. RESHMA K. SAMAJI ------ MEMBER
   LECTURER IN MARATHI
   GOVT. SARDAR'S PU COLLEGE
   BELGAUM.
   COLLEGE CODE NO : DD0003

**साहित्य मंथन भाग १**

## गद्यविभाग

## खालील प्रश्नातील वाक्यासाठी योग्य पर्यायाची निवड करुन लिहा.

### १. चक्रधरांची अहिंसावृत्ती व विनोदबुध्दी - म्हाइंभट

**१) श्री चक्रधर स्वामी या ठिकाणी बसले होते -----**

अ) डोंगराखाली ब) झाडाखाली क) पर्वताखाली ड) देवळात.

**२) महात्मे याना म्हटले आहे ----**

अ) संत ब) बैरागी क) ससा ड) वाघ

**३) सश्याच्या पाठीमागे हे लोक लागले होते -----**

अ) पारधी ब) लमाणी क) गुराखी ड) गावातील लोक.

**४) चक्रधरानी यांचे हिंसेपासून मन परिवर्तन केले ----**

अ) गुराखी ब) पारधी क) चोर ड) दरोडेखोर.

**५) बोणेबाईने यांच्या नावाने जोरात हाका मारल्या -----**

अ) मुनिदेवांच्या ब) आई-बाबांच्या क) परमेश्वरांच्या ड) संतांच्या

**६) चोर यांना पाहून पळून गेला ----**

अ) पोलीसांना ब) गोसाव्यांना क) गावकऱ्यांना ड) पारध्यांना.

**७) जाड वस्त्र यांचे होते ----**

अ) चक्रधरांचे ब) मालकांचे क) चोरांचे ड) नातेवाईकांचे

### २. दत्ताजी शिंदे यांचे वीरमरण व वीरवचन --- भाऊसाहेबांची बखर

**८) पाटील दुराणीची फौज झाडून उतरली आहे असे हे म्हणाले ---**

अ) तान्हाजी खराडा ब) राजाराम क) राघोबा पागे ड) गोविंदपंत बुंदले.

**९) बाणांचा वर्षाव याप्रमाणे होत होता -----**

अ) पावसाप्रमाणे ब) मेघमालेप्रमाणे क) विजेप्रमाणे ड) वादळाप्रमाणे

**१०) क्षत्रियांचा स्वधर्म यांनी सांगितला -----**

अ) जनकोजी शिंदे ब) राजाराम क) दत्ताजी शिंदे ड) बयाजी शिंदे

**११) कुतुबशहाच्या युध्दात यांच्या दंडाला बंदुकिची गोळी लागली -----**

अ) दत्ताजी शिंदे ब) राजाराम क) जनकोजी शिंदे ड) गोविंदपंत बुंदेले.

**१२) " बचेंगे तो और बी लढेंगे " असे कोण म्हणाले ----**

अ) मल्हारराव होळकर ब) दत्ताजी शिंदे क) जनकोजी शिंदे ड) अब्दुल अली

### ३) शेतकऱ्यांची परिस्थिती ---- म. जोतीबा फुले

**१३) महात्मा फुले यांनी यांची दयनीय परिस्थिती मांडली आहे------**

अ) स्त्रियांची ब) शेतकऱ्यांची क) सावकारांची ड) नोकरांची

**१४) म. फुले यानी शेतकऱ्यांची तुलना यांच्या बरोबर केली आहे ----**

अ) गोरा शिपाई ब) कलेक्टर क) अधिकारी ड) कारकुन

**१५) हे लोक ब्रिटिश सरकारला वेगवेगळे कर देत होते -----**

अ) शेतकरीवर्ग ब) अधिकारीवर्ग क) गोरा शिपाई ड) कलेक्टर

**१६) ब्रिटीश सरकारने यांच्यासाठी दवाखान्याची सोय केली होती -----**

अ) शेतकरीवर्ग ब) मजूरवर्ग क) कामगार वर्ग ड) गोरा शिपाई

## ४. युवकांपुढील आव्हाने --- यशवंतराव चव्हाण

**१७) देशाच्या विकासासाठी हे आव्हान आहे ---**

अ) आर्थिक ब) सामाजिक क) राजकिय ड) परराष्ट्रीय

**१८) अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, व शिक्षण या लोकांच्या गरजा आहेत ----**

अ) दुय्यम गरजा ब) प्राथमिक गरजा क) मध्यमवर्गीय गरजा ड) कामगारांच्या गरजा

**१९) भारत इतिहासात प्रदिर्घकाळ परकियांच्या अंमलाखाली भरडला गेला कारण -----**

अ) विभाजक प्रवृत्ती ब) एकता प्रवृत्ती क) गुलामी प्रवृत्ती ड) समाजप्रवृत्ती

**२०) आज तरूण पिढीमध्ये ही भावना वाढविली पाहिजे -----**

अ) देशभक्तीची ब) भाषाभक्तीची क) संस्कृतीभक्तीची ड) परंपराभक्तीची

**२१) महात्मा गांधीजी नेहमी याचा विचार करत ----**

अ) प्रांताचा ब) शहराचा क) संबंध भारताचा ड) गावांचा

## ५. घार हिंडते आकाशी -- -- सिंधुताई सपकाळ

**२२) सिंधुताई सपकाळ यांनी या विमानतळावर पहिले पाऊल ठेवले ---**

अ) हिथ्रो ब) फ्रांस क) जर्मनी ड) इटली

**२३) मादाम तुसॉच्या प्रदर्शनात यांचे पुतळे होते ----**

अ) मातीचे ब) सोन्याचे क) मेणाचे ड) चांदीचे

**२४) लंडन शहर या नदीच्या किनारी वसलेले आहे -----**

अ) जेंम्स नदी ब) थेम्स नदी क) सिंधू नदी ड) नाईल नदी

**२५) थेम्स नदी पहाताच सिंधुताई सपकाळ यांना या नदीची आठवण झाली ---**

अ) कावेरी ब) गंगा क) यमुना ड) पंचगंगा

## ६. जातील हे बी दिवस ---- प्र. ई. सोनकांबळे

**२६) प्र. ई. सोनकांबळे याना किती दाजी होते -----**

अ) दोन ब) तीन क) एक ड) चार

**२७) धोंडीबा या गावी रहात होता ----**

अ) जगळपूरला ब) ढगळपूरला क) चेऱ्याला ड) वाडीला

**२८) किशन या गावी रहात होता ---**

अ) अ) चेऱ्याला ब) खनगावला क) जगळपूरला ड) वाडीला

**२९) चेऱ्याच्या अक्काला दाजीने मारले की प्रल्हाद या बहिणीकडे जात ---**

अ) सकीकडे ब) मुगताबाईकडे क) जनीबाईकडे ड) पार्वतीबाईकडे

**३०) प्रल्हाद जगळपूरला गेला की या देवळात बसत --**

अ) मऱ्याआईच्या देवळात ब) देवीच्या देवळात क) भवानीच्या देवळात ड) रेणूका देवीच्या देवळात

**३१) प्रल्हादच्या या बहिणीचे घर जळले ---**

अ) पार्वतीचे ब) मुगताचे क) जनीचे ड) सखीचे

## ७. शेरास सव्वाशेर --- भा. वि. वरेरकर

**३२) वसंताला हिच्याशी लग्न व्हावे असे वाटत होते ----**

अ) गोदावरी ब) यमुनेशी क) कावेरीशी ड) गंगेशी

**३३) रावबहादूरांच्या मुलाचे नांव हे आहे -----**

अ) वसंत ब) राजस क) गुलाब ड) विष्णूपंत

**३४) यमुनेला याचा फार तिटकारा होता -------**

अ) नवऱ्याचा ब) सोन्याचा क) हिऱ्याचा ड) घराचा

**३५) गुलाबला आकस्मिक वैभव मिळाल्याचे ऐकताच यांचा स्वभाव बदलला ------**

अ) विष्णूपंत ब) रावबहादूर क) वसंत ड) दिगंबरपंत

## ८. नावलौकिक संत : संत कनकदास -- बी. ए. कांबळे

**३६) संत कनकदासांचा जन्म कर्नाटकातील या गावी झाला ----**

अ) बाड ब) काड क) आड ड) या पैकी नाही

**३७) विजयनगरच्या साम्राज्याचे हे अत्यंत विश्वासू होते ----**

अ) बिरप्पा ब) विजयदास क) महिपतीराय ड) विरप्पा.

**३८) कनकदासांचे मूळ नांव हे होते -----**

अ) तिम्मप्पा ब) तिमपा क) विठ्ठल ड) कनक

**३९) संत कनकदासांचे गुरू हे आहेत ------**

अ) श्रीपादराय ब) व्यासराय क) पुरंदरदास ड) विजयदास

**४०) संत कनकदासांना उडपीच्या या देवाचे दर्शन घेण्यास मज्जाव केला -----**

अ) श्रीकृष्णाचे ब) विठ्ठलाचे क) विष्णूचे ड) शंकराचे

**४१) दास परंपरेतील आद्य कवी हे आहेत -----**

अ) नरहरी तिर्थ ब) व्यासराय क) श्रीपादराय ड) पुरंदरदास

## ९. जेंव्हा आपलाच इतिहास आपण विसरतो.... सुधा मूर्ती

**४२) सुधा मूर्ती याना ओजस्वी तर्फे हा पुरस्कार मिळाला होता ------**

अ) संजीवनी ब) एकता क) राष्ट्रीय ड) ओजस्विनी

**४३) 'भारत छोडो' चळवळ कधी झाली होती -----**

अ) सन् १९४७ ब) सन् १९४२ क) सन् १९४६ ड) सन् १९४७

**४४) सुधा मूर्ती यांचा या विषयाबद्दल सिध्दांत आहे ------**

अ) वाचन ब) लेखन क) संभाषण ड) श्रवण

**४५) सुधा मूर्ती यांना ओजस्विनी पुरस्कारात ही सुंदर प्रतिकृती मिळाली होती ----**

अ) राणीलक्ष्मीबाई ब) वीरराणी कित्तूर चन्नम्मा क) छ.शिवाजी महाराज ड) राणी ताराबाई

## १०. वीरमाता जिजाऊ ---- प्रा.अशोक राणा

**४६) वीरमाता जिजाऊंची जन्म तारीख ही आहे ----**

अ) १२ जानेवारि १५९८ ब) ११ जानेवारी १५९८ क) १२ जनेवारी १५९९ ड) १२ डिसेंबर १५९८

**४७) वीरमाता जिजाऊंच्या वडिलांचे नांव हे आहे -----**

अ) मालोजी जाधव ब) लखुजी जाधव क) धनाजी जाधव ड) संताजी जाधव

**४८) रामसिंग भाट व बजरंग भाट यांनी यांच्या जन्माचे वर्णन केले आहे -----**

अ) म्हाळसाबाईचे ब) ताराबाईचे क) सोयराबाईचे ड) जिजाबाईचे

**४९) चितोडला या राजाने वेढा दिला ------**

अ) अल्लाउद्दीन खिलजी ब) औरंगजेब क) शहाजहान ड) बाबर

**५०) राष्ट्रमाता जिजाऊंचा विवाह यांच्याशी झाला -----**

अ) शहाजी भोसले ब) यल्लोजी भोसले क) राणोजी भोसले ड) संताजी भोसले

## ११. टारफुला ---शंकर पाटील

**५१) केरुनानांना भेटण्यासाठी हे गेले होते ----**

अ) काका पाटील ब) दादा पाटील क) पंच पाटील ड) रामा पाटील.

**५२) केरूनानांचे यांच्याशी भांडण झाले होते------**

अ) गायकवाड घराण्याशी ब) पाटील घराण्याशी क) भोसले घराण्याशी ड) मोरे घराण्याशी

**५३) 'गळ्याची शपथ घेतो' हे वाक्य कोणी म्हटले आहे ----**

अ) दादा पाटील ब) नाना पाटील क) ताराबाई ड) लक्ष्मी

**५४) केरूनानांच्या मळ्यात मोट ही चालवत होती----**

अ) लक्ष्मी ब) सरस्वती क) तुळशी ड) सावित्री

**५५) केरूनानांच्या मळ्यात हिने बंदुक चालवून दाखविली -----**

अ) पार्वती ब) लक्ष्मी क) सरस्वती ड) तारामती

## १२. संगणकाचे महत्व ----- माधव राजगुरू

**५६) रघुनाथरावांचा मुलगा या ठिकाणी राहत होता ------**

अ) चेन्नई ब) पुणे क) मुंबई ड) बेंगलोर

**५७) रघुनाथरावांना चेन्नईत राहण्यास यामुळे कंटाळा आला ----**

अ) अपरिचय व अमराठी ब) घरात कोणी नाही क) टी. व्ही. नाही ड) घरात बसून

**५८) इंटरनेटला मराठीत असा शब्द आहे -----**

अ) जालआंतर ब) आंतरजाल क) आंतरजाळे ड) इंटरनेट

**५९) वेबसाइटला मराठीत असा शब्द आहे-------**

अ) संकेतस्थळ ब) निर्दिष्टस्थळ क) नेटस्थळ ड) ठिकाण

**६०) पासवर्डला मराठीत असा शब्द आहे--------**

अ) सांकेतीक शब्द ब) सूचना शब्द क) लक्षात ठेवण्याचा शब्द ड) ओळखीचा शब्द.

## पद्यविभाग

## १. महदंबेचे धवळे ---- महदंबा

**६१) रूक्मिणी यांना वृत्तांत विचारते ----**

अ) सखीला ब) आईला क) मावशीला ड) आत्याला

**६२) रूक्मिणीचा विवाह आई-वडिलांनी यांच्याशी ठरविला होता ----**

अ) शिशुपाळाशी ब) नरेंद्राशी क) श्रीकृष्णाशी ड) श्रीरामाशी

**६३) रूक्मिणीने याचे स्मरण केले -----**

अ) शंकराचे ब) श्रीकृष्णाचे क) देवाचे ड) आई-वडिलांचे

**६४) रूक्मिणीला यांचा बंदिवास नको होता -----**

अ) आई-वडिलांचा ब) भाऊचा क) शिशुपाळाचा ड) सखीचा

**६५) रूक्मिणीला यांच्या बरोबर विवाह करण्याची इच्छा होती ------**

अ) श्रीकृष्णाबरोबर ब) सुदामाबरोबर क) शिशुपाळाबरोबर ड) श्रीरामाबरोबर

## २. गुरूमहात्म्य ---- संत ज्ञानेश्वर

**६६) संत ज्ञानेश्वरानी प्रथम यांना वंदन केले आहे ------**

अ) स्वामिला ब) सरस्वतीला क) गणेशाला ड) आई-वडिलाना

**६७) संत ज्ञानेश्वरांच्या मनात हे आहेत ----**

अ) आई-वडिल ब) सद्‌गुरू क) विठ्ठल ड) श्रीविष्णू

**६८) चिंतामणी ही उपमा याना दिली आहे -----**

अ) सद्‌गुरूला ब) देवाला क) विठ्ठलाला ड) झाडाला.

**६९) सर्व तिर्थांचे स्नान एकाच ठिकाणी येथे घडते -----**

अ) नदी ब) तलाव क) समुद्र ड) तीर्थस्थान

**७०) 'गुरूमहात्म्य' या ओव्या या ग्रंथातून घेतल्या आहेत -----**

अ) ज्ञानेश्वरी ब) अमृतानुभव क) गौळण ड) अभंग

## ३. संतवाणी

### अ. मनुष्य करिसी -- -- संत नामदेव

**७१) संत नामदेवांना यांची ओढ लागली आहे -----**

अ) विठ्ठलाची ब) आळंदीची क) देहूची ड) पंढरपुरची

**७२) संत नामदेव या परमेश्वराकडे मागणे मागत आहे -----**

अ) विठ्ठलाकडे ब) खंडोबाकडे क) शंकराकडे ड) विष्णूकडे

### ब. विठु माझा लेकुरवाळा --- संत जनाबाई

७३) 'लेकुरवाळा' हा शब्द यांना उद्येशून म्हटला आहे -----

अ) विठ्ठलाला ब) आई-वडिलांना क) देवाला ड) कुटुंबाला

**७४) भक्तांच्या सोहळ्यात सर्वात पुढे हे संत आहेत ----**

अ) संत नामदेव ब) संत गोरा कुंभार क) संत निवृत्तीनाथ ड) संत ज्ञानेश्वर

### क. हीन याती माझी देवा --- संत चोखामेळा

**७५) संत चोखामेळ्याला विठ्ठलाकडे येऊ देत नाहीत कारण ---**

अ) दलित ब) कुणबी क) सवर्ण ड) शेतकरी

**७६) संत चोखामेळ्याला याची सेवा करायची आहे -----**

अ) विठ्ठलालाची ब) आई-वडिलांची क) समाजाची ड) दलितांची

### ड. चंदनाचे हात पायही चंदन --- संत तुकाराम

**७७) 'चंदनाचे हात पायही चंदन' या अभंगात यांची लक्षणे सांगितली आहे -----**

अ) सज्जनांची ब) दुर्जनांची क) मुर्खांची ड) मित्रांची

**७८) संत तुकारामांचा जन्म या गावी झाला -----**

अ) देहू ब) आळंदी क) पंढरपूर ड) पैठण

## ४. सीतागीत --- मोरोपंत

**७९) सीतेची सेवा यानी केली ------**

अ) भावोजीने ब) पतीने क) आईने ड) वडिलाने

**८०) शूर्पणखेच्या कानाचा व नाकाचा छेद यानी केला -----**

अ) लक्ष्मणाने ब) रामाने क) रावणाने ड) मारीच राक्षसाने

**८१) रावणाने यांच्याशी युध्द केले ----**

अ) रामाशी ब) कुंभकर्णाशी क) लक्ष्मणाशी ड) वानरसेनेशी

**८२) मायावी-मृगा मागे हे धावत गेले -----**

अ) सीता ब) राम क) लक्ष्मण ड) रावण

**८३) मारीच राक्षसाने हूबेहूब यांचा आवाज काढला -----**

अ) लक्ष्मणाचा ब) रामाचा क) सीतेचा ड) रावणाचा

**८४) सीता रागाने याना बोलली -----**

अ) लक्ष्मणाला ब) रामाला क) कुंभकर्णाला ड) रावणाला

## ५. लटपट लटपट तुझे चालणे -- - होनाजी बाळा

**८५) नायिकेचे वय वर्ष एवढे आहे ----**

अ) १५ वर्ष ब) १६ वर्ष क) १७ वर्ष ड) १८ वर्ष

**८६) नायिकेला पाहून यांची स्थिती वेड्यावाणी झाली -----**

अ) सरदारांची ब) सैनिकांची क) सुभेदारांची ड) सेनापतींची

**८७) नायिकेच्या डोळ्यांना याची उपमा दिली आहे------**

अ) मृगनयना ब) मननयना क) कोकीळनयना ड) खलनयना

**८८) नायिकेचे बोलणे असे आहे -----**

अ) मंजूळ मैने सारखे ब) मंजूळ कोकीळे सारखे क) मंजूळ पोपटा सारखे ड) मंजूळ चिमणी सारखे

## ६. मराठी माती - कुसुमाग्रज

**८९) मराठी मातीचा टीळा येथे लावा ------**

अ) कपाळावर ब) गालावर क) हातावर ड) डोक्यावर

**९०) सह्याद्रिच्या कडे-कपारीतून हे ओहळ वाहातात ----**

अ) प्रेमाचे ब) आनंदाचे क) ओढ्याचे ड) स्वाभिमानाचे

**९१) चार वर्णातून ही पालखी फिरत आहे -----**

अ) सरस्वतीची ब) गणपतीची क) महादेवाची ड) देवाची

**९२) मराठी मातीचा झेंडा यांच्यासाठी फडकला -----**

अ) हातोड्यासाठी ब) विळ्याकोयत्यांच्यासाठी क) तलवारीसाठी ड) आपल्यासाठी

**९३) यांच्यासाठी खड्ग खंबीर राहिले -----**

अ) कंगालांच्यासाठी ब) सैनिकांच्यासाठी क) सरदारांच्यासाठी ड) श्रीमंतासाठी

## ७. आईची आठवण– माधव ज्युलियन

**९४) आईच्या आठवणीने मुलाला हे आठवले ------**

अ) ब्रम्हांड ब) स्वर्ग क) आई ड) देव

**९५) जगात सारे परत मिळते मात्र एक गोष्ट परत मिळत नाही -----**

अ) घर ब) पैसा क) समृध्दी ड) आई

**९६) विद्याधनसंपत्ती मिळाली पण मुलगा मात्र याला पोरका राहिला ----**

अ) आईच्या प्रेमाला ब) बहिणीच्या प्रेमाला क) वडिलांच्या प्रेमाला ड) भाऊच्या प्रेमाला

**९७) आईविना मुलाची ही भूक शांत होत नाही -----**

अ) जेवणाची ब) पदार्थाची क) आईच्या प्रेमाची ड) मावशीच्या प्रेमाची

**९८) आईविना मुलाची यांच्याबरोबर ताटातूट झाली आहे ----**

अ) आई ब) वडील क) भाऊ ड) बहीण

## ८. संसार --- बहिणाबाई चौधरी

**९९) संसारात आधी हाताला चटके मग मिळते -----**

अ) चपाती ब) रोटी क) पुरी ड) भाकर

**१००) संसाराला कधी हे म्हणू नये ------**

अ) खोटा ब) खरा क) स्वार्थी ड) वाईट

**१०१) राऊळाच्या कळसाला कधी हे म्हणू नये -----**

अ) लोटा ब) घागर क) खोटा ड) मटके

**१०२) संसारात किती लोकांचा विचार असतो -----**

अ) तिघांचा ब) दोघांचा क) एकट्याचा ड) सर्वांचा

**१०३) संसारात कशाचा व्यवहार असतो ---**

अ) आनंदाचा ब) सुख दुःखाचा क) सुखाचा ड) दुःखाचा

## ९. पंचारती -- इंदिरा संत

**१०४) सह्याद्रीच्या कड्यावरी कशाची नौबत वाजत आहे ----**

अ) वाऱ्याची ब) ढगाची क) पावसाची ड) उन्हाची

**१०५) शकुनांचा दीप यानी हाती घेतला आहे -----**

अ) जनाबाई ब) बहिणाबाई क) महदंबा ड) मुक्ताबाई

**१०६) सडासंमार्जन हिने केले आहे ----**

अ) संत जनाबाई ब) लक्ष्मीबाई टिळक क) संत कान्होपात्रा ड) संत सोयराबाई

**१०७) भाकर घेऊन ओवाळाया या उभ्या आहेत ----**

अ) जनाबाई ब) बहिणाबाई क) महदंबा ड) जिजाऊ

**१०८) यांच्या हाती पुण्य-तिर्थाचा कलश आहे ---**

अ) जनाबाई ब) बहिणाबाई क) अहिल्याबाई ड) जिजाबाई

## १०. आनंदी पक्षी - बालकवी

**१०९) आनंदी पक्षाची सृष्टी यांनी भरली आहे ----**

अ) दुःखाने ब) सुखाने क) आनंदाने ड) नैराश्याने

**११०) आनंदी पक्षी या ठिकाणी राहतो -----**

अ) प्रीती शांती ब) प्रीती-आनंद क) शांती-आनंद ड) सुख-दुख

**१११) मानवी जीवनासाठी कशाच्या राशी आहेत -----**

अ) आनंदाच्या ब) दुःखाच्या क) सुखाच्या ड) सुख- दुःखाच्या

**११२) आनंदी पक्षाचे रुप कसे आहे –**

अ) सुंदर ब) लडिवाळ क) गोजीरवाणे ड) अवखळ

**११३) आनंदी पक्षाचे जीवन या रसाने भरले आहे ------**

अ) प्रेमरसाने ब) दुःखाच्यारसाने क) भक्तीरसाने ड) आनंदीरसाने

## ११. तेंव्हा जीवन मला कळू लागले ---वामन कर्डक

**११४) जीवनाचा अर्थ यावेळी कळू लागतो ----**

अ) केस गळू लागतात तेंव्हा ब) आजारपण येते तेंव्हा क) तारूण्यपण येते तेंव्हा ड) एकटेपणा येतो तेंव्हा

**११५) कवीने समाजासाठी कोण म्हणून सेवा दिली ----**

अ) सेवक म्हणून ब) माणूस म्हणून क) समाज सेवक म्हणून ड) कार्यकर्ता म्हणून

**११६) म्हतारपणात व्याख्यानासाठी समाज याना टाळू लागला -----**

अ) वामनाला ब) सुदामाला क) हरिला ड) नरेशला

## १२. रबीची पेरणी -----फ.म. शहाजिंदे

**११७) शेतकऱ्यांला ही पेरणी करायची आहे ----**

अ) रबीची ब) खरीपाची क) उन्हाळयाची ड) पावसाळयाची

**११८) शेतकऱ्याला याच्याशी गोड बोलावं लागतंय ---**

अ) सूतारपाटलांशी ब) मजुरांशी क) मालकांशी ड) बैलवाल्यांशी

**११९) ही पेरणी सोपी आहे -------**

अ) रबीची ब) खरीपाची क) उन्हाळयाची ड) पावसाळयाची

**१२०) रबीच्या पेरणीत याला फार महत्व आहे ------**

अ) बैलवाल्यांला ब) सुतारपाटलाला क) वेळेला ड) मजुराना

**१२१) रबीच्या पेरणीत याला फार ताप होतो ------**

अ) मालकांला ब) बैलवाल्यांला क) शेतकऱ्यांला ड) मजूरांला

## १३. पोरी -- अनुराधा पाटील

**१२२) पुलाच्या कठड्यावर पाय झुलवत ही बसली आहे -------**

अ) मुलगी ब) बाई क) आई ड) बहीण

**१२३) परंपरेचे काटेरी कुंपण याला म्हटले आहे-----**

अ) बाप नवरा मुलगा ब) बाप नवरा मुलगी क) आई वडील भाऊ ड) सासू सासरा नवरा

**१२४) मुलीला केवढे स्वातंत्र्य मिळते -----**

अ) हातभर ब) ओंजळभर क) चिमूटभर ड) पूर्ण स्वातंत्र्य

**१२५) स्वतःच्या जीवनाचा पिळ कसा सोडवीला पाहिजे -----**

अ) दुसऱ्याने ब) स्वःताच क) घरातल्या लोकांनी ड) आई-वडिलांनी.

# खालील कंसात दिलेले योग्य शब्द निवडून लिहा

१) **सीता पुस्तक वाचीत होती** - या वाक्याचा **काळ.**
२) **आई -** या शब्दाला **समानार्थी** शब्द
३) **जय -** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द
४) **विडा उचलणे** - **वाक्प्रचारांचा अर्थ**
५) **लेटर -** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( भुतकाळ , वर्तमानकाळ, पराजय, प्रतिज्ञा करणे, पत्र, माता )**

१) **गौरी अभ्यास करत आहे** - या वाक्याचा **काळ.**
२) **घर -** या शब्दाला **समानार्थी** शब्द
३) **प्रकाश -** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द
४) **धुळ चारणे -** **वाक्प्रचारांचा अर्थ**
५) **मॅरेज -** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( सदन, अंधार, पराभव करणे, विवाह, वर्तमानकाळ, भविष्यकाळ )**

१) **रमेश उद्या मुंबईला जाणार आहे** – या वाक्याचा **काळ.**
२) **रात्र --** या शब्दाचा **समानार्थी** शब्द
३) **भरती ---** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द
४) **नाकी नऊ येणे** - **वाक्प्रचारांचा अर्थ**
५) **ड्रामा -** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( बेजार होणे, नाटक, निशा, ओहोटी, भविष्यकाळ, वर्तमानकाळ )**

१) **सुरेश मुंबईला गेला होता** --- या वाक्याचा **काळ.**
२) **राजा ---** या शब्दाचा **समानार्थी** शब्द
३) **खरेदी --** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द
४) **उधाण येणे --** **वाक्प्रचारांचा अर्थ**
५) **'इव्हेंट'---** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( घटना, भविष्यकाळ, भुतकाळ, भूप, विक्री, भरती येणे )**

१) **सुजाता वर्गात फारच हुशार मुलगी होती.** --- या वाक्याचा **काळ.**
२) **सूर्य --** या शब्दाचा **समानार्थी** शब्द
३) **समर्थ ---** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द
४) **खापर फोडणे ----** **वाक्प्रचारांचा अर्थ**
५) **युनिफोर्म ---** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( वर्तमानकाळ, गणवेश, दोष देणे, असमर्थ, भास्कर, भुतकाळ )**

१) **नरेश व्यायाम करत आहे ---** या वाक्याचा **काळ.**

२) **सिंह --** या शब्दाचा **समानार्थी** शब्द

३) **सदाचार --** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द

४) **कानाडोळा करणे-** **वाक्प्रचारांचा अर्थ**

५) **सेल्समॅन -** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( वर्तमानकाळ, दुराचार, भुतकाळ, दुर्लक्ष करणे, विक्रेता, केसरी )**

१) **नीता खेळत आहे --** या वाक्याचा **काळ.**

२) **डोके --** या शब्दाचा **समानार्थी** शब्द

३) **स्वार्थी --** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द

४) **चटका बसणे --** **वाक्प्रचारांचा अर्थ**

५) **एजंट ---** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( भुतकाळ, मस्तक, दुःख होणे, निःस्वार्थी, प्रतिनिधी, वर्तमानकाळ )**

१) **ओमकार' उद्या खेळायला जाणार -** या वाक्याचा **काळ.**

२) **वारा -** या शब्दाचा **समानार्थी** शब्द

३) **ज्ञान ---** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द

४) **राम नसणे---** **वाक्प्रचारांचा अर्थ**

५) **टॅक्स --** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( कर, वर्तमानकाळ, पवन, अज्ञान, अर्थ नसणे' भविष्यकाळ )**

१) **मीना संगीत ऐकत आहे --** या वाक्याचा **काळ.**

२) **पर्वत --- -** या शब्दाचा **समानार्थी** शब्द

३) **हिंसा ---** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द

४) **जीवाचं रान करणे -----** **वाक्प्रचारांचा अर्थ**

५) **मॉरल ---** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( नग, अहिंसा, वर्तमानकाळ, खूप कष्ट करणे, नैतिक, भूतकाळ )**

१) **राणीचा वर्गात प्रथम क्रमांक येईल—** या वाक्याचा **काळ.**

२) **राजा ---** या शब्दाचा **समानार्थी** शब्द

३) **जमा ---** या शब्दाचा **विरूध्दार्थी** शब्द

४) **मन घालणे ---** **वाक्प्रचारांचा अर्थ**

५) **झीरो ---** या इंग्रजी शब्दाला **मराठी प्रति शब्द**

**( शून्य, भविष्यकाळ, लक्ष देणे, खर्च, भुतकाळ, नृप )**

**खालील ‘अ’ गटात पाठाची नावे दिली असून ‘ब’ गटात लेखकाची नावे दिली आहेत . योग्य त्या जोड्या जुळवा.**

| ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|
| १) टारफूला | अ) नागनाथ कोत्तापल्ले |
| २) वीरमाता जिजाऊ | ब) अनुराधा पाटील |
| ३) रबीची पेरणी | क) अशोक राणा |
| ४) पोरी | ड) वामन होवाळ |
| ५) बदलते बोरगांव | इ) शंकर पाटील |
| | ई) फ. म. शहाजिंदे |

| ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|
| १) संगणकाचे महत्व | अ) महादेव मोरे |
| २) जेंव्हा आपलाच इतिहास आपण विसरतो | ब) बालकवी |
| ३) पंचारती | क) माधव राजगुरू |
| ४) आनंदी पक्षी | ड) सुधा मूर्ती |
| ५) पहिली शिकार | इ) मथू सावंत |
| | ई) इंदिरा संत |

| ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|
| १) हीन याती माझी देवा | अ) संत तुकाराम |
| २) चंदनाचे हात पायही चंदन | ब) अशोक राणा |
| ३) वीरमाता जिजाऊ | क) नागनाथ कोत्तापल्ले |
| ४) टारफूला | ड) संत चोखामेळा |
| ५) बदलते बोरगांव | इ) शंकर पाटील |
| | ई) संत जनाबाई |

| ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|
| १) महदंबेचे धवळे | अ) मथू सावंत |
| २) गूरूमहात्म्य | ब) भा.वि. वरेरकर |
| ३) शेरास सव्वाशेर | क) माधव राजगूरू |
| ४) संगणकाचे महत्व | ड) महदंबा |
| ५) तिची वाटच वेगळी | इ) संत ज्ञानेश्वर |
| | ई) अशोक राणा |

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) शेतकऱ्यांची परिस्थिती | अ) महादेव मोरे |
| २) युवकांपुढील आव्हांने | ब) फ. म. शहाजिंदे |
| ३) पोरी | क) अनुराधा पाटील |
| ४) रबीची पेरणी | ड) म. जोतीराव फुले |
| ५) पहिली शिकार | इ) यशवंतराव चव्हाण |
| | ई) संत जनाबाई |

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) घार हिंडते आकाशी | अ) नागनाथ कोत्तापल्ले |
| २) जातील हे बी दिवस | ब) इंदिरा संत |
| ३) संसार | क) सिंधूताई सपकाळ |
| ४) पंचारती | ड) बहिणाबाई चौधरी |
| ५) बदलते बोरगांव | इ) प्र. ई. सोनकांबळे |
| | ई) अनुराधा पाटील |

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) शेरास सव्वाशेर | अ) बहिणाबाई चौधरी |
| २) नांव लौकिक संत - संत कनकदास | ब) भा.वि. वरेरकर |
| ३) तिची वाटच वेगळी | क) बी.ए. कांबळे |
| ४) देव घावला देव पावला | ड) वामन होवाळ |
| ५) संसार | इ) मथू सावंत |
| | ई) महादेव मोरे |

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) घार हिंडते आकाशी | अ) महादेव मोरे |
| २) जातील हे बी दिवस | ब) कुसुमाग्रज |
| ३) मराठी माती | क) माधव ज्युलियन |
| ४) आईची आठवण | ड) प्र. ई. सोनकांबळे |
| ५) पहिली शिकार | इ) सिंधुताई सपकाळ |
| | ई) मथू सावंत |

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) युवकांपुढील आव्हांने | अ) वामन होवाळ |
| २) शेतकऱ्यांची परिस्थिती | ब) होनाजी बाळा |
| ३) सीतागीत | क) यशवंतराव चव्हाण |
| ४) लटपट लटपट तुझे चालणे | ड) म. जोतीराव फुले |
| ५) देव घावला ! देव पावला | इ) मोरोपंत |
| | ई) कुसुमाग्रज |

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) लीळाचरित्र | अ) महादेव मोरे |
| २) मनुष्य करिसी | ब) वामन होवाळ |
| ३) विठु माझा लेकुरवाळा | क) संत नामदेव |
| ४) देव घावला ! देव पावला | ड) संत जनाबाई |
| ५) पहिली शिकार | इ) म्हाइंभट |
| | ई) संत चोखामेळा |

## गद्यविभाग

### लीळाचरित्र ---- म्हाइंभट

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) म्हाइंभटांच्या 'अहिंसावृत्ती' या लीळेचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा

२) चक्रधर स्वामीनी पारध्यांना सस्याची शिकार करायला का दिले नाही ? त्याचा परिणाम काय झाला ?

३) चक्रधर स्वामीनी पारध्यांचे मन परिवर्तन कसे केले ते लीळेच्या आधारे सविस्तर लिहा.

४) चक्रधर स्वामीनी पारध्यांची समजूत कशा प्रकारे घातली ते सविस्तर लिहा.

५) बोणेबाईच्या घरात झालेल्या चोरीचे संकट कोणी व कसे दूर केले ?

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " महात्मे हो : आतां जाए ऐसे : भणौनि : जानु उचलिली :"

२) " धांव वा मुनिदेया : चोरे नागविले: वा मूनिदेया: "

३) सर्वज्ञे म्हणीतले : बाइ : तरि कवणे कवणु नागवीला:"

४) " हां गा : एथ सरण आलेया काइ मरण असे : "

५) " बाइ : हे एवढे एयातें एसणें एक वाढीनलें देखीलें : तो भीयाला : तो गेला : "

**टीपा लिहा.**

१) चक्रधर आणि पारध्यांचा संवाद

२) चक्रधर स्वामींचीविनोदबुध्दी.

३) बोणेबाई व चक्रधर स्वामी यांच्यातील संवाद लिहा.

## २. दत्ताजी शिंदे यांचे वीरमरण व वीरवचन -- भाऊसाहेबांची बखर

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) तानाजी खराडा यांनी दत्ताजी शिंदे याना काय सांगितले ? त्याला दत्ताजी शिंदे यानी काय उत्तर दिले ?

२) दत्ताजी शिंदे यानी सांगितलेला क्षत्रियाचा स्वधर्म लिहा.

३) दत्ताजी शिंदे यांच्या स्वभावाचे वर्णन करा.

४) दत्ताजी शिंदे याना रणांगणात वीरगती कशी प्राप्त झाली ते सविस्तर लिहा

५) दत्ताजी शिंदे व अब्दाली यांच्यात झालेल्या युध्दाचे वर्णन करा

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " रणांत मृत्यू आला तर उत्तम आहे नाही तर विष भक्षूण प्राण द्यावा. "

२) " मराठियास पाठीवर काठी उडत असली तरच हिंमत होते."

३) " आपण मेला, जग बुडाला, अबरू जाते आणि वाचतो कोण ? "

४) " बहुत दिवस यांचे अन्न भक्षिले, आणि पाहिजे तितके विलास यांच्या जीवावर केले."

५) " बाबा आंम्हास सोडून गेले, आता आम्हास देशी तोंड दाखवावयास येणार नाही."

**टीपा लिहा.**

१) दत्ताजी शिंदे यांचे वीरमरण व वीरवचन यावर लिहा.

२) दत्ताजी शिंदेंची यांची देशभक्ती.

३) राजाराम चोपदार यांचा एकनिष्टपणा.

## ३. शेतकऱ्यांची परिस्थिती --- महात्मा फुले

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे व परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

२) शेतकऱ्यांचा आहार, पोषाक, घर या विषयी माहिती लिहा .

३) सरकारी कामगारांच्या परिस्थितीचे वर्णन म. फुले यानी कसे केले आहे ?

४) शेतकरी व गोरा शिपाई यांची तुलनात्मक माहिती लिहा.

५) म. फुले यानी शेतकऱ्यांचे दारिद्र्य नाहीसे करण्यासाठी सूचविलेले उपाय लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " त्यास राहण्याकरिता लाखो रूपये खर्ची घालून सरकारने दोन मजली टोलेजंग बराकी बांधल्या आहेत."

२) " मग कलेक्टर वगैरे कामगारा सारख्या नबाबांचे येथील बेलगामी किरकोळ खर्चाविषयी गोष्ट काढल्यास आमचे कोण ऐकतो."

**टीपा लिहा.**

१) म. फुले यांच्या काळातील भारतीय शेतकरी .

२) गोऱ्या अधिकाऱ्यांना मिळणाऱ्या सवलती.

## ४. युवकांपुढील आव्हाने ----यशवंतराव चव्हाण

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) लेखक यशवंतराव चव्हाण यानी आर्थिक आव्हानासंबंधी मांडलेले विचार लिहा.
२) लेखक यशवंतराव चव्हाण यानी सामाजिक आव्हानासंबंधी मांडलेले विचार लिहा.
३) लेखक यशवंतराव चव्हाण यानी परराष्ट्रीय आव्हानासंबंधी मांडलेले विचार लिहा.
४) लेखक यशवंतराव चव्हाण यानी राजकीय आव्हानासंबंधी मांडलेले विचार लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "परंतु अशाने आपल्या प्रगतीचे पाऊल कधीच पुढे पडणार नाही."
२) " विचार स्वातंत्र्य आणि आचार स्वातंत्र्य ही लोकशाहीची पायाभूत कल्पना आहे. "
३) " वयच केवळ नव्हे तर आपल्यापुढील आव्हान स्वीकारून त्याला तोंड देण्याची कुवत हे पण मी तारूण्याचे गमक मानतो."
४) ' माझे धैर्य कदापि खचणार नाही."
५) " देशातील जनतेमध्ये एकात्मतेची भावना कशी निर्माण करता येईल हे मूलभूत आव्हान आपल्या पुढे आहे."

**टीपा लिहा.**

१) लेखक यशवंतराव चव्हाण यानी देशाच्या एकात्मतेविषयी मांडलेले विचार लिहा.
२) सामाजिकआव्हानांना सामोरे जाण्यासाठी तरूणांनी कोणती कर्तव्ये केली पाहिजेत.
३) आर्थिक विकासात समाजाचे योगदान.

## ५. घार हिंडते आकाशी ----- सिंधुताई सपकाळ

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) सिंधुताई सपकाळ यानी हिथ्रो विमान तळावर पाऊल ठेवताच त्यांच्या मनात कोणते विचार आले ? सविस्तर उत्तर लिहा.
२) थेम्स नदी पहाताच सिंधूताईंना कोणकोणत्या नद्यांची आठवण झाली ? ते सविस्तर उत्तर लिहा.
३) लंडन शहर, मादाम तुसॉचे प्रदर्शन या विषयी माहिती लिहा.
४) " घार हिंडते आकाशी" या पाठाच्या शिर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " एकादं दुःख विसरण्यासाठी कामात हरवून जाणं तिच्यात मला दिसलं."
२) "आपण आपल्यासाठी जगतो, पण काही माणसं देशासाठी जगतात."
३) " आपण कुठे तरी आपल्या जगातून दुसऱ्या जगात पोहोचलं असं वाटलं."
४) " ब्रिटिशांनी कोणे एकेकाळी आम्हाला लुटून नेले. आज आम्ही आमच्या माणुसकीच्या धड्याने त्यांना लुटुन नेत आहोत."

**टीपा लिहा.**

१) सिंधुताईंचा लंडन प्रवासातील अनुभव.

२) सिंधुताईना हॉटेलात भेटलेली म्हातारी आजी.

३) सिंधुताईनी पाहिलेले मादाम तुसॉचे प्रदर्शन.

४) लेखिका सिंधुताई सपकाळ यांच्याविषयी माहिती लिहा.

## ६. जातील हे बी दिवस --- प्र. ई. सोनकांबळे

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) 'जातील हे बी दिवस' या पाठातील धोंडिबा विषयी माहिती लिहा.

२) 'जातील हे बी दिवस' या पाठातील किशन विषयी माहिती लिहा.

३) लेखक प्र. ई. सोनकांबळे याना किसंडाबापूंच्या घरी आलेले अनुभव लिहा.

४) लेखक प्र. ई. सोनकांबळे, किशनदाजीच्या घरी न जाता देवळात जाऊन का बसत असे ?

५) किशनने प्रल्हादला जगळपूरला का आणले ? व त्याला कसे फसविले ते लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " लोकांनी निवद-बिवद बोनं नारोळ ठिवल्यालं खावं वाटायचं पण खायचो नाही."

२) त्याला संसार करता येत न्हाई मग लेकरं कशाला हळजावं, निसपुरी भाड्यानं. गोसायनं."

३) " परलादनं काय आनलंय माय मुगताला. आता सन जवळ आलाय."

४) " गेलो एक्या दिवशी खोपाड्याच्या शेतातून कडबा आणायला. लई धांडाळ व्हता कडबा. मला किती येणार. लई कुतून आनलं तर दोन कवा तीन पेंढ्या."

५) " अरं, त्या किसनदादाचा म्हेवना हाय, किसनचा म्हेवना."

**टीपा लिहा.**

१) सकी विषयी माहिती लिहा.

२) मुगता विषयी माहिती लिहा.

३) सकीचे घर कशामुळे जळाले ? व ते कसे उभे केले ते लिहा.

## ७. शेरास सव्वाशेर ----- भा. वि. वरेरकर

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) गुलाबरावांनी रावबहादूरांना कोणती थाप मारली ? तिचा परिणाम काय झाला ?

२) रावबहादुरांचा ढोंगी स्वभाव स्पष्ट करा.

३) 'शेरास सव्वाशेर' या नाटकात शेर कोणाला म्हटले आहे व सव्वाशेर कोणाला म्हटले आहे त सविस्तर लिहा.

४) दिगंबरपंतांच्याकडे यमुनेच्या लग्नासाठी विष्णूपंत व रावबहादूर यानी कोणकोणत्या मागण्या केल्या ते सविस्तर लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ विष्णूपंत, बोलणं सभ्य असावं, ही काय भाषा ! काय झालं ?”

२) “ मला आणखी एक योजना सुचली आहे, आमची मंजिरीही आता लग्नाची झाली आहे.”

३) “ सोन्याचा तर तिला अगदी तिटकारा आहे.”

४) “ सारे धन्य झाले माझ्या धन्याचं धन कोण पाहिल ? हुंडा काय घ्यायचा ?”

५) “ भ्रम आहे ! डॉक्टर, सगळा भ्रम आहे ! मिशीला तूप लावून लोकात मिरवायचं येवढंच.”

**टीपा लिहा.**

१) ‘शेरास सव्वाशेर’ या नाटकातील रावबहादूर यांचा स्वभाव.

२) ‘शेरास सव्वाशेर’ या नाटकातील विष्णूपंत यांचा स्वभावगुण.

३) गुलाबरावांच्या उसण्या श्रीमंतीचा प्रभाव स्पष्ट करा.

## ८. नावलौकिक संत - संत कनकदास -- बी. ए. कांबळे

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ‘तिम्मप्पा’ ते ‘संत कनकदास’ हे नामाभिदान कसे झाले ते सांगा.

२) संत कनकदासांची कौटुंबिक माहिती लिहा.

३) संत कनकदासांनी जातीय भेदाचे खंडन कसे केले आहे ते सविस्तर उत्तर लिहा.

४) संत कनकदास प्रपंच्याकडून परमार्थाकडे कसे वळले ते लिहा.

५) संत कनकदासांनी प्राणी हत्येला विरोध का केला ? ते स्पष्ट करा.

६) संत कनकदासा विषयी थोडक्यात माहिती लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ सत्य आणि सूजनास’ जात नसते.”

२) “ श्रीहरीचे साक्षात विष्णूरूपात दर्शन घडवून आणणे शक्य आहे काय ?”

३) ‘ जिथे कुणीच नाही अशा एकांतस्थळी जाऊन केळी खा.”

४) “ गुरूदेव आपण म्हणता त्याप्रमाणे मला केळी खाण्यासाठी एकांताचे ठिकाणअद्याप भेटले नाही.”

**टीपा लिहा.**

१) संत कनकदास- केळी खाण्याची परीक्षा.

२) संत कनकदास- मी गेल्यास जाईन.

३) संत कनकदासानी घडविले देवदर्शन.

## ९. जेंव्हा आपलाच इतिहास आपण विसरतो

----- सुधा मूर्ती ( अनुवाद : लीना सोहनी )

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) देशासाठी लढणाऱ्या वीर स्त्रीयांचे योगदान तुमच्या शब्दात लिहा.

२) लेखिकेने स्मृतीचिन्हांचा इतिहास विमान प्रवासातील दोन्ही मुलांना कसा समजावून दिला ते लिहा.

३) दिल्ली-बेंगलोर फ्लाईटमध्ये लेखिकेला आलेला अनुभव धक्कादायक का वाटतो ?

४) लेखिकेचे ‘संभाषण’ या विषयाबद्दलचा सिध्दांत उदाहरणासहित स्पष्ट करा.

५) सुधा मूर्ती यानी स्मृतिचिन्हाचा इतिहास दोन मुलांना कसा सांगितला ते लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ तुम्ही पहिल्या स्वातंत्र्य समराविषयी काही ऐकलं आहे का ?”

२) “ ते खेळणं नाहीये तो पुरस्कार आहे” मी तिला सांगितयं.”

३) “ तुम्हाला घोड्यांची खूप आवड आहे वाटतं ?”

४) “ तुम्ही जरा तिकडे जाऊन तो पुतळा नीट निरखून बघा.”

**टीपा लिहा.**

१) लेखिका सुधा मूर्ती यांच्या विषयी माहिती लिहा.

२) लेखिकेला विमान प्रवासातील मुलांनी दिलेली उत्तरे हास्यास्पद का वाटतात ?

३) झाशीची राणी लक्ष्मीबाई विषयी माहिती लिहा.

## १०. वीरमाता जिजाऊ --------प्रा. अशोक राणा

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ‘वीरमाता जिजाऊ’ या पाठातील जिजाऊंच्या विषयी माहिती लिहा.

२) राणी म्हाळसाबाईनी जिजाऊंना कोणकोणती माहिती सांगितली ते लिहा.

३) लखुजी जाधव यांचेकडून जिजाऊंच्यावर कोणकोणते संस्कार झाले ते लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “भारताच्या इतिहासाला कलाटणी देऊन पारतंत्र्याचा अंधार दूर करणाऱ्या वीरमातेच्या जन्माचा सोहळा अशारीतीने सूचकपणे पार पडला.”

२) “आपल्या मुलांप्रमाणेच जिजाऊंना देखील त्यांनी घोड्यावर बसणे, तलवार चालविणे, प्रतिपक्षावर हल्ला करणे इ. युध्दशास्त्रातीलही शिक्षण दिले असावे.”

**टीपा लिहा.**

१) जिजाऊंच्या जन्माचे भाटानी केलेले वर्णन.

२) वीरमाता जिजांऊ यांचा जन्म व बालपण याची माहिती द्या.

३) भोसले घराण्याचा इतिहास लिहा.

## ११. टारफुला --- शंकर पाटील.

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) केरूनानांने स्वत:च्या आणि घरच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाय योजना केली ?

२) पाटला विषयी असणारा केरूनानांचा गैर समज कसा दूर झाला ?

३) केरूनानांनी आपल्या मुलींना स्वरक्षणार्थ मर्दुमकीचे धडे कसे दिले ?

४) 'टारफुला' या कथेतील केरूनानांचे व्यक्तिमत्व तुमच्या शब्दात लिहा.

५) केरूनानांनी पाटलांच्यावर कोणता आरोप केला ?

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " हितनं सारी आता बेकीच बघा !"

२) " लेक आणि ल्योक असा फरक न्हाही केलेला आम्ही."

३) " उगा असं आडमाप बोलू नका केरूनाना."

४) " तिळभर नेम चुकायचा न्हाई हं !"

५) " मनात काय ऱ्हावू ने म्हणून मुद्दामच आलो होतो."

६) " आता निर्मळ झालं म्हणनासा मन. "

७) " मी हाय मोटेवर. तू जरा बंदूक चालवून दाव बगू पाटलास्नी."

**टीपा लिहा.**

१) 'टारफुला' या पाठातील दादा पाटलानी केरूनानांच्या मळ्यातील पाहिलेले दृष्य.

२) केरूनाना तुरूंगात गेल्यानंतरची घराची परिस्थिती.

३) दादा पाटील केरूनानाकडे का आले होते ते स्पष्ट करा.

## १२. संगणकाचे महत्व ---- माधव राजगुरू

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) संगणकाचा महिमा अगाध आहे, हे विधान स्पष्ट करा.

२) संगणकाने संपूर्ण जगाला कसे जवळ आणले आहे ते स्पष्ट करा.

३) संगणका मार्फत आपणास घरी बसून कोण कोणती कामे करता येतात ?

४) संगणकामुळे पूर्वीच्या प्रवेश प्रक्रियेत कोणता बदल झाला आहे ते लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " नाही बाळानो, आता मी जास्त दिवस इथे राहू शकत नाही. मला घरी गेलंच पाहिजे."

२) " आजोबा घरी बसून कॉलेजमध्ये प्रवेश कसा घ्यायचा , हेच तुम्हाला जाणून घ्यायचं होतं ना ? तर ऐका.

३) " आता जगात अशक्य असं काहीच राहिले नाही."

४) " आजोबांच्या मनातला पुण्याला जाण्याचा विचार तुर्तास तरी पुसला गेला."

**टीपा लिहा.**

१) आजोबांना घरी  बसल्या मराठी वर्तमान पत्रे कशी उपलब्ध करून दिली ? ते स्पष्ट करा.

२) आजोबांच्या दिनक्रमाबद्दल  माहिती लिहा.

३) ई-मेल बद्दलची आजोबांना  कशी माहिती दिली ते लिहा .

## पद्यविभाग

### 1. महदंबेचे धवळे ----- महदंबा

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) 'महदंबेचे धवळे' या कवितेतील रूक्मिणीच्या मनाची झालेली अवस्था लिहा.

२)'शिशुपालचा बंदिवास नको आहे' असे रूक्मिणी का म्हणते ते कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

३) रूक्मिणीवर विवाहासंबंधी  कोणते संकटआले होते आणि तिने कोणाचे स्मरण केले ? सविस्तर लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " काइ बोले माता पीता काई बोले तो रूकमिया भाइ:
शीशुपाळु वरीएलीति ऐसे बोलणे आहे तेयाचा ठाइ :"

२) " स्मरीले कृष्णरावो देवा संकष्टी पडलीए थोरी :
तु एकु वांचोनिया सोडवीता अनु नाही अवधारी :"

३) " आरतांदानी देवा कृपा करा माझी दीन उधरणा :
शीशुपाळ बंदीसाळ चुकवी दाखवीआपुले श्रीचरण :"

**टीपा लिहा.**

१) 'महदंबेचे धवळे' या कवितेचा भावार्थ लिहा.

## २. गुरूमहात्म्य ----संत ज्ञानेश्वर

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१)संत ज्ञानेश्वरानी गुरूभक्तीचे महात्म्य उदाहरणासहित कसे स्पष्ट केले आहे ते लिहा.

२) 'गुरूमहात्म्य' या कवितेचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

३) गुरूमहात्म्य' या ओव्यातील विविध उपमांचे विश्लेषण करा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " मज ऱ्हदयी सद्गुरू । तेणे तारिलो हा संसारपूरू ॥
म्हणऊनी विशेषे अत्यादरू । विवेकावरी ॥"

२) " म्हणोनि जाणतेनो गुरू भजिजे । तेणे कृतकार्य होईजे ॥
जैसे मूळसिंचने सहजे । शाखा पल्लव संतोषती ॥"

**टीपा लिहा.**

१) गुरूमहात्म्य.

## ३. संतवाणी

### अ) मनुष्य करिसी ---- संत नामदेव

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) 'मनुष्य करिसी' या अभंगातून विठ्ठल भक्ती संबंधी संत नामदेवांचे विचार स्पष्ट करा.

२) 'मनुष्य करिसी'या अभंगातून संत नामदेवांनी लोकजीवनातील कोणत्या प्रतिमांचा वापर केला आहे ते लिहा.

३) संत नामदेवांनी पुढील जन्मीही विठ्ठलाची भक्ती करता यावी यासाठी कोणकोणते मागणे मागितले आहे ?

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषे । तुझे द्वारी वसे ऐसे करी ॥"

२) " पक्षी करिसी तरि चारियाचेनि मिषे । तुझे द्वारी वसे ऐसे करी ॥"

**टीपा लिहा.**

१) संत नामदेवांची विठ्ठलभक्ती.

२) संत नामदेवांना लागलेली विठ्ठलाची ओढ.

### ब. विठु माझा लेकुरवाळा -- संत जनाबाई

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) संत जनाबाईने भक्तांच्या सोहळ्यात कोणकोणत्या संतांचा समावेश केला आहे ते सविस्तर लिहा.

२) ' विठु मझा लेकुरवाळा' या अभंगाचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " विठु माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ॥"

२) " जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ॥"

**टीपा लिहा.**

१) संत जनाबाईने रेखाटलेले विठ्ठलाचे कुटूंबवत्सल रूप.

## क. हीन याती माझी देवा --- संत चोखामेळा

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ' हीन याती माझी देवा ' या अभंगातून संत चोखामेळा कोणती खंत व्यक्त करतात ?

२) संत चोखामेळ्याला विठ्ठलाजवळ का येऊ देत नाहीत ? अभंगाच्या आधारे स्पष्ट करा.

३) संत चोखामेळ्याने विठ्ठलाजवळ कोणती वेदना व्यक्त केली आहे ?

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ॥

२) " माझ्या गोविंदा गोपाळा । करूणा भाकी चोखामेळा॥"

**टीपा लिहा.**

१) ' हीन याती माझी देवा ' या अभंगाचा भावार्थ लिहा.

## ड. चंदनाचे हात पायही चंदन ---- संत तुकाराम

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) संत तुकारामानी सांगितलेली सज्जन पुरूषाची लक्षणे सविस्तर लिहा.

२) संत तुकारामानी आपल्या अभंगात वापरलेल्या लोकजीवनातील उपमांचे स्पष्टीकरण करा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " दीपा नाही पाठी पोटी अंधकार । सर्वांगी साकर अवघी गोड ॥"

२) " तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।पाहता अवगुण मिळेचि ना ॥"

**टीपा लिहा.**

१) 'चंदनाचे हात पायही चंदन' या अभंगाचा भावार्थ लिहा.

## ४. सीतागीत --- मोरोपंत

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) " सीतागीत" मधील मारीच राक्षसाला मायावी सुवर्ण मृगाचे रूप का धारण करावे लागले ?

२) सीतेच्या मनात निर्माण झालेला खेद कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

३) रावणाच्या राक्षसांनी रामाबरोबर युध्द का केले ? त्याचा परिणाम काय झाला ?

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " स्वर्ण रत्न-मय मृग म्यां देखीला । तो सत्य लेखिला मनामध्ये ॥
गृहा आणावया मागे हरीणा मी । दुःख परिणामी नेणोनियां ॥"

२) " तो बाण लागता ह्रदय विदारी । दुष्ट हाक मारी स्वामी-वाणी॥
हां सीते हां बंधो लक्ष्मणा ये धांवे । अंत-काळी पावे, भेटावया ॥"

३) " ऐशी बाई माझी ऐकतांची वाणी । डोळा आले पाणी भावोजीच्या ॥
मातेने दापीता वत्स पित्याकडे । जाय तैसे घडे लक्ष्मणासी ॥"

**टीपा लिहा.**

१) " सीतागीत" या कवितेतील सीता व लक्ष्मण यांचा संवाद लिहा.

२) " सीतागीत" कवितेचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

## ५. लटपट लटपट तुझे चालणे ---- होनाजी बाळा

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) 'लटपट लटपट तुझे चालणे' मधील नायिकेचे वर्णन कवीने कसे केले आहे ?

२) 'लटपट लटपट तुझे चालणे' या कवितेत आलेल्या उपमांच्या आधारे नायिकेचे वर्णन करा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " वय वरूषें पंध्राचि दिसे चंद्राचि प्रभा ढवळी
आकृती लहान दिसे कवळी ॥"

२) " रूपसुर्तिचा डौल तेज अनमोल सगुण गहिना
जैसि का पिंजऱ्यातिल मैना ।"

**टीपा लिहा.**

१) 'लटपट लटपट तुझे चालणे' या लावणीचा भावार्थ लिहा.

२) नायिकेचे सौंदर्य व सरदारांची झालेली अवस्था यावर लिहा.

## ६. मराठी माती -- कुसुमाग्रज

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) मराठी मातीचा महिमा तुमच्या शब्दात लिहा.

२) मराठी मातीला हीनदीन समजू नका असे कवी का म्हणतात ?

३) “ मराठी माती” या कवितेतील मराठी मातीचे स्वभावगुण लिहा.

४) “ मराठी माती” या कवितेतील आशावाद कविने कसा व्यक्त केला आहे ते लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ कडे कपारीत उभी
हिच्या शिवाची देवळे,
तेज संरितामधून,
स्वाभिमानाचे ओहळे.”

२) “ रत्नजडित अभंग,
ओवी अमृताची सखी,
चारी वर्णातूनि फिरे,
सरस्वतीची पालखी.

३) “येथे फडकला झेंडा,
विळ्याकोयत्यांच्यासाठी ,
खड्ग खंबीर राहिले,
सदा कंगालांच्या पाठी.”

**टीपा लिहा.**

१) मराठी मातीचा स्वाभिमान.

२) आद्य स्वातंत्र्याचा महिमा.

## ७) आईची आठवण --- माधव ज्युलियन

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ‘आईची आठवण’ या कवितेतील बाळाची झालेली अवस्था यावर सविस्तर लिहा.

२) ‘आईची आठवण’ या कवितेचा भावार्थ लिहा.

३) ‘आईची आठवण’ या कवितेतील पोरक्या मुलाने कोणते मागणे मागितले आहे ?

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ तू माय लेकरू मी, तू गाय, वासरू मी;
ताटातुटी जहाली, आता कसे करू मी ?”

२) “ सारे मिळे परंतू आई पुन्हा न भेटे,
तेणे चित्ताच चित्ती माझ्या अखंड पेटे.”

३) “ घे जन्म तू फिरूनी येईन मिही पोटी,
खोटे ठरो ना देवा, ही एक आसं मोठी.”

**टीपा लिहा.**

१) आईविना पोरकेपणाची व्यथा.

## ८. संसार -- बहिणाबाई चौधरी

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) कवयित्रीने संसाराची महती उदाहरणासहित कशी स्पष्ट केली आहे ते सविस्तर लिहा.

२) ‘आधी कष्ट मग फळ’ हा सफल संसाराचा मंत्र ‘संसार’ कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

३) ‘संसार’ हा सुख-दु:खाचा व्यापार आहे असे कवयित्रीला का वाटते ? कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

४) ‘संसार’ या कवितेत संसारासाठी वापरलेल्या विविध उपमांच्या आधारे कवितेचा भावार्थ लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ अरे, संसार संसार
जसा तावा चुल्ह्यावर,
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर. ”

२) “ अरे, संसार संसार
नाही रडनं कुढनं,
येड्या गयातला हार
म्हणू नको रे लोढनं.”

३) “ ऐका संसार संसार,
दोन्ही जीवाचा इचार
देतो दु:खाले होकार
अन् सुखाले नकार .”

**टीपा लिहा.**

१) ‘संसार’ या कवितेचा भावार्थ लिहा.

२) बहिणाबाई चौधरी यानी ‘संसार’ या कवितेतून व्यक्त केलेले विचार लिहा.

## ९. पंचारती - इंदिरा संत

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्राच्या स्वागताला कोणकोणत्या मानाच्या धनिणी आलेल्या आहेत ? सविस्तर उत्तर लिहा.

२) ‘ पंचारती’ कवितेतून महाराष्ट्रातील तेजस्वी, कर्तृत्ववान, स्त्रियांचा गौरव कवयित्रीने कशा प्रकारे केला आहे ते सविस्तर लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ केली जळक्या काडीची ,
लक्ष्मीबाईने लेखण,
चित्रे रेखिली स्वागता
रंग प्राणाचे भरून.”

२) “ ओवाळाया महाराष्ट्रा ,
आज जिजाईच्या हाती,
कोटि सूर्याच्या तेजाने,
उचंबळे पंचारती.”

**टीपा लिहा.**

१) महाराष्ट्रातील मानाच्या धनिणींचे योगदान.

२) “पंचारती’ कवितेचा भावार्थ.

## १०. आनंदी पक्षी --- बालकवी

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) पक्षीजीवन व मानवी जीवनाची तुलना बालकवीनी कशी केली आहे ते सविस्तर लिहा.

२) ‘पक्षी जीवनातील आनंद मानवाच्या जीवनातही अवतीर्ण व्हावा’ ही कवींची इच्छा स्पष्ट करा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “ हिरवे हिरवे रान विलसते । वृक्षलतांची दाटी जेथे ।
प्रीती शांती जिथे खेळते । हा वसतो तेथे ।”

२) “आम्हांकरिता दुर्धर चिंता । नाना दुःखे हाल सभोता ,
पुरे ! नको ही नरतनु आता । दुःखाची राशी ।”

३) “बा आनंदी पक्ष्या देई । प्रसाद अपुला मजला काही ।
देणे मन हे गुंगुन जाई ! प्रेमाच्या डोही .”

**टीपा लिहा.**

१) पक्षी जीवनातील आनंद.

२) ‘आनंदी पक्षी’ या कवितेतील मानवी जीवन.

## ११. तेंव्हा जीवन मला कळू लागले ---- वामन कर्डक

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ‘तेंव्हा जीवन मला कळू लागले’ या कवितेतील कवींचा जीवन विषयक अनुभव स्पष्ट करा.

२) मोहोळ, मधमाशा व मानवी जीवनातील प्रसंग यातून कविला काय सुचवायचे आहे ? सविस्तर लिहा.

३) ‘तेंव्हा जीवन मला कळू लागले’ या कवितेत कवीने कशा प्रकारे खंत व्यक्त केली आहे ते लिहा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) “बाग मागे आणि आग होती पुढे,
पंख पसरीत गेलो मी ज्योतिपुढे
पंख सारेच तेथे जळू लागले । तेंव्हा ...”

२) “ एक सेवक होऊन सेवा दिली
लोक उलटून म्हणतात केंव्हा दिली
बोल उलटे हे जेंव्हा मिळू लागले । तेंव्हा ...”

३) “गोडी होती मधाची मला जोवरी
लाख लटकून होते मोहोळा परी
संपता अर्क सारे पळू लागले । तेंव्हा ...”

**टीपा लिहा.**

१) ‘तेंव्हा जीवन मला कळू लागले’ या कवितेचा आशय स्पष्ट करा.

## १२. रबीची पेरणी ---फ. म. शहाजींदे

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) रबीची पेरणी करावयाची असताना शेतकऱ्याला काय करावे लागते ?

२) ‘रबीची पेरणी या कवितेचा आशय स्पष्ट करा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) " आगाताची पेरणी रबीहून जरा सोपी हाय
रबीच्या पेरनीत बैलवाला लई ताप व्हत्यय."

२) "पेरनी लांबली तर दनक्याला फरक, पडत्यय
येळला लई महत्व हाय."

३) "झक मारून डबल पेरनी करावी पडतिया
एक तर हाय ? काय करावं ?"

**टीपा लिहा.**

१) रबीची पेरणी.

२) रबीच्या पेरणीत शेतकऱ्यांपुढे असणाऱ्या समस्या.

## १३. पोरी --- अनुराधा पाटील

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) 'पोरी' या कवितेतील 'काटेरी कुंपण' यातून कवयित्रीला काय सुचवायचे आहे ?

२) कवयित्री अनुराधा पाटील यांनी छोट्या मुलीच्या भावी जीवनाचे रेखाटलेले भावपूर्ण कल्पना चित्र स्पष्ट करा.

३) 'पोरी' या कवितेतील पारंपारिक स्त्री दृष्टीकोन व आधुनिक दृष्टिकोन स्पष्ट करा.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) "मी पाहते तिला,
गरगरत्या आकाशपाळण्यात
वाहत्या वाऱ्याच्या
कानाशी बिलगून खिदळताना
जिथं जमिनीवरचे
पाय सुटण्याची भीती तिला
स्पर्शही करत नाहीय."

२) " म्हणून जगण्याच्या अंगानेच
उलघडत न्यावा लागेल तुला
तुझ्या झुलल्या झोक्याच्या दोराला
पडणारा पीळ."

**टीपा लिहा.**

१) 'पोरी' कवितेतील समाजातील संघर्ष.

२) 'पोरी' कवितेतील जीवनविषयक दृष्टीकोन.

# स्थूलवाचन

## १. बदलते बोरगांव --- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) बोरगावात बस आल्यामुळे लोकांच्या वृत्तीत व प्रवृत्तीत कसा बदल झाला ते लिहा.

२) शहरातल्या पांडोबा जाधवाने केलेली आर्थिक प्रगती लिहा.

३) सुखलालशेठचा स्वार्थी स्वभाव लिहा.

४) विठ्ठलरावाच्या आईने व्यापाऱ्याला काय सांगितले ते लिहा.

५) बोरगांव महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रात आल्यामुळे झालेले बदल लिहा.

६) विठ्ठलरावाच्या आईचे श्रेष्ट अर्थशास्त्र लिहा.

## २. पहिली शिकार ----- महादेव मोरे

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) नागा जमातीत असलेल्या परंपरा लिहा.

२) नायकाने केलेल्या पहिल्या शिकारीचे वर्णन करा.

३) नायकाने अजगराची केलेली शिकार या बद्दल सविस्तर लिहा.

## ३. तिची वाटच वेगळी --- - मथू सावंत

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) चंद्रकलेचे गावासंबंधी असलेले स्पप्न कोणते ते सविस्तर लिहा.

२) चंद्रकला सरपंच होऊ नये म्हणून श्रीपती व गंगाधर यानी रचलेले कारस्थान लिहा.

३) चंद्रकलेने श्रीपती व गंगाधरला कशाप्रकारे अद्दल घडविली ते लिहा.

४) चंद्रकलेच्या सासुचा स्वभाव लिहा.

५) चंद्रकले विषयी लिहा.

## ४. देव घावला ! देव पावला --- वामन होवाळ

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) यलाप्पा व कुसाच्या जीवनात झालेला बदल लिहा.

२) अण्णा भगताने गावातील सामान्य माणसांच्या अंध्दश्रध्देचा फायदा कसा करून घेतला ते लिहा.

३) यलाप्पा व कुसा देवीची सेवा करताना त्यांच्या जीवनाचे वर्णन करा.

# खालील विषयावर निबंध लिहा

१) एक रम्य पहाट.

२) परीक्षेच्या निकालाचा दिवस.

३) डोंगरावरून दिसणारा निसर्ग देखावा.

४) आम्ही जत्रेला जातो.

५) सभेतील माझे पहिले भाषण.

६) एका किल्ल्याचे वर्णन.

७) फळ्याचे आत्मवृत्त.

८) माझा आवडता संत.

९) माझा आवडता छंद

१०) माझा आवडता कवी.

११) आजचे चित्रपट.

१२) ग्रंथ हेच आपले गुरू.

१३) खेळाचे जीवनातील महत्व.

१४) विज्ञानाचे चमत्कार.

१५) मराठी- मातृभाषेचे महत्व.

१६) साक्षरता – विकासाचा पाया.

१७) झाडे वाढवा- झाडे जगवा.

१८) पर्यावरण आणि मानवी जीवन.

१९) पर्यावरण संवर्धन काळाची गरज.

२०) जीवनात विनोदाचे महत्व.

२१) आमच्या गावची जत्रा.

****** ॐ ******